PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ya Gol Gol Dabyatla
Year: 2012

Song: To Visara Chehra
Lyricist:

तो विसरा चेहरा तो जुना
आता नवा झालो पुन्हा
तो विसरा गाव तो जुना
रस्ता नवा करतो खुणा
ती पर्वा दुनियेची
नको चिंता नको दुःख पुन्हा
हा पैसा आहे तो खरा
त्याच्याविना देव उणा
आयुष्य माझे बदलून गेले
जगात या मस्त मी बादशहा
तो विसरा चेहरा तो जुना
आता नवा झालो पुन्हा
तो विसरा गाव तो जुना
रस्ता नवा करतो खुणा

स्वर्ग हा भोवती असा
अप्सरा या सुंदर मेनका
कैफ हा की तो चढला असा
आता ही नशा जरा उतरेचना
सारे नव्याने समजून आले
जगात या मस्त मी बादशहा
तो विसरा चेहरा तो जुना
आता नवा झालो पुन्हा
तो विसरा गाव तो जुना
रस्ता नवा करतो खुणा

चांदणे दिवसा कसे
या जीवा कसे लागे पिसे
डोळ्यापुढे हे पडदे हालते
आता दूरचे मला ते ना दिसे
स्वप्नातले ते सत्यात आले
जगात या मस्त मी बादशहा
तो विसरा चेहरा तो जुना
आता नवा झालो पुन्हा
तो विसरा गाव तो जुना
रस्ता नवा करतो खुणा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*